महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ ०१ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २१६ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## लक्षवेधी

### २०३० पर्यंत भारतीयांचे दरडोई उत्पन्न वाढणार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

२०३० पर्यंत भारताचं दरडोई उत्पन्न ४ हजार डॉलर्सच्या पुढे जाईल असं स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अहवालात म्हटलं आहे. यामुळे जागतिक बँकेच्या वर्गवारीनुसार भारत चीन आणि इंडोनेशियाच्या रांगेत जाऊन बसणार आहे. भारताला एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनायला साठ वर्षं लागली मात्र २०१४ नंतर केवळ सात वर्षांत भारतीय अर्थव्यवस्था दोन ट्रिलियन आणि पुढल्या सात वर्षात तीन ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचली आहे. तर २०२५ मधे अर्थव्यवस्थेने चार ट्रिलियन डॉलरचा टप्पा गाठला. पुढल्या दोन वर्षांत भारतीय अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलरचं लक्ष्य गाठेल असं स्टेट बँक ऑफ इंडियाच्या या अहवालात म्हटलं आहे. २०१९ मधे भारताचं दरडोई उत्पन्न दोन हजार डॉलरपर्यंत पोहोचलं, २०२६ मधे ते ३ हजार डॉलरपर्यंत पोहोचेल. गेल्या दशकभरात भारत आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्याचं या अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

### सुनेत्रा पवारांचा उपमुख्यमंत्रिपद स्वीकारल्यानंतर पहिली प्रतिक्रिया

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

"दादांच्या अकाली जाण्याने मनावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला असला, तरी त्यांनी शिकवलेली कर्तव्यनिष्ठा, संघर्षाची ताकद आणि जनतेप्रतीची बांधिलकी हाच माझा खरा आधार आहे. त्यांच्या स्वप्नातील न्यायप्रिय, समताधिष्ठित आणि विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी अखंड प्रामाणिकपणे काम करत राहीन," असेही पुढे सुनेत्रा पवार म्हणाल्या आहेत.

पुढे चालत राहीन....

याबरोबरच सुनेत्रा पवार यांनी अजित पवारांच्या विचारांना उजाळा देत पुढे चालत राहू असा विश्वास देखील व्यक्त केला आहे. त्या म्हणाल्या की, "या कठीण क्षणी महाराष्ट्रातील जनतेने दिलेली प्रेमाची साथ हेच माझे बळ आहे. आपल्या विश्वासाच्या जोरावर, दादांच्या विचारांना उजाळा देत, नव्या आशेने पुढे चालत राहीन."

"आदरणीय अजितदादांनी आयुष्यभर शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि वंचित घटकांसाठी जगण्याचा मंत्र दिला. आज त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत 'शिव-शाहू-फुले-आंबेडकर' यांच्या विचारांवर निष्ठा ठेवून कर्तव्य भावनेने उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारताना मन अक्षरशः भरून येत आहे.

### अंबरनाथ शहरातील नादुरुस्त पथदिव्यांसाठी तक्रार व्यवस्था सुरु



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ** : अंबरनाथ नगरपरिषद कार्यक्षेत्रातील नागरिकांसाठी पथदिव्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी तक्रार नोंदविण्याकरिता स्वतंत्र संपर्क क्रमांक प्रसिद्ध करण्यात आला आहे. अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील नगरपरिषद मालकीचे एलईडी पथदिवे बंद किंवा नादुरुस्त असल्यास, तसेच पथदिव्यांबाबत कोणतीही तक्रार असल्यास नागरिकांनी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन नगरपरिषदेकडून करण्यात आले आहे.

तक्रार नोंदविताना संबंधित परिसर किंवा विभागाचे नाव, शक्य असल्यास खांब क्रमांक, तक्रारीचा संक्षिप्त तपशील तसेच तक्रारदाराचे नाव व संपर्क क्रमांक देणे आवश्यक आहे. पथदिव्यांबाबत तक्रार नोंदविण्यासाठी मो. क्रमांक ९१८०९७०१९५९५ या क्रमांकावर संपर्क साधावा. ही सेवा एम/एस बीएसी इन्फ्राटेक प्रा. लि. आणि एम/एस विन्सी ग्लोबल प्रा. लि. (संयुक्त उपक्रम) यांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे.

नागरिकांनी तक्रार नोंदविताना आवश्यक माहिती अचूकपणे दिल्यास पथदिव्यांची दुरुस्ती वेळेत करणे सुलभ होणार असून, शहरातील पथदिवे व्यवस्था अखंडितपणे सुरू ठेवण्यास मदत होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी या उपक्रमास सहकार्य करावे, असे आवाहन अंबरनाथ नगरपरिषदेने केले आहे.

# सुमित्रा पवार यांनी घेतली उपमुख्यमंत्री पदाची शपथ

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**राज्याच्या राजकारणात सध्या एका नव्या पर्वाची चर्चा सुरू आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रीपदाची धुरा सुनेत्रा पवार यांनी सांभाळली आहे. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे, राजभवनामध्ये उपमुख्यमंत्र्यांच्या शपथविधी सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं.**





राज्यपालांनी सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रिपदाची शपथ दिली आहे. या शपथविधी सोहळ्यासाठी राष्ट्रवादीचे प्रमुख नेते उपस्थित होते, महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री होण्याचा मान हा सुनेत्रा पवार यांना मिळाला आहे. दरम्यान उपमुख्यमंत्रिपदाच्या शपथविधी सोहळ्यापूर्वी राष्ट्रवादीच्या सर्व आमदारांची मुंबईमध्ये एक महत्त्वाची बैठक पार पडली होती. या बैठकीमध्ये सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या गटनेतेपदी निवड करण्यात आली, आणि त्यानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे.

अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर आज निधनाच्या चौथ्या दिवशी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. अजित पवारांकडे अर्थ, नियोजन अशी महत्त्वाची खाती होती, ही खाती राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार) मिळावीत, अशी अपेक्षा पक्षाला होती. मात्र सुनेत्रा पवार किंवा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला तुर्तास तरी अर्थ खाते देण्यात आलेले नाही.

अजित पवार यांच्याकडे मधल्या काही वर्षांचा अपवाद वगळता गेल्या अनेक वर्षांपासून अर्थ खात्याची जबाबदारी आहे. यापूर्वी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या आघाडी सरकारच्या काळातही अर्थ खाते राष्ट्रवादी काँग्रेसकडे होते. ज्येष्ठ नेते जयंत पाटील आणि सुनील तटकरे यांनी ते अनेक वर्षे भूषविले होते. तर महाविकास आघाडी आणि महायुती सरकारमध्येही अर्थ खाते अजित पवार यांच्याकडे होते.

**सुनेत्रा पवार यांच्याकडे तीन खाती**

राज्याच्या ११ व्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा आणि युवक कल्याण आणि अल्पसंख्याक विकास ही तीन खाती देण्यात आली आहेत. तर अजित पवारांचे नियोजन आणि वित्त हे खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःकडे ठेवले आहे.

महायुतीच्या मंत्रिमंडळात अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ आणि हसन मुश्रीफ हे राष्ट्रवादी काँग्रेसमधील ज्येष्ठ मंत्री आहेत. अर्थ खाते राष्ट्रवादी काँग्रेसकडेच ठेवण्याचा पक्षाचा प्रयत्न होता. मात्र भाजपा यास तयार नसल्याचे सध्या दिसत आहे.

### काटेवाडीचा कायापालट आणि राज्याला मिळालेली दिशा

**आज जे आपण 'निर्मल ग्राम' किंवा 'स्वच्छता अभियान' पाहतो, त्याची बीजे सुनेत्रावहिनींनी 2002 मध्येच काटेवाडीत रोवली होती. एकेकाळी घाणीचं साम्राज्य असलेल्या काटेवाडीला त्यांनी देशातील पहिलं 'सायबर ग्राम' आणि 'पर्यावरण ग्राम' बनवलं. त्यांनी सुरू केलेले 'शाळा प्रवेश उत्सव' आणि 'गुड मॉर्निंग पथक' यांसारखे उपक्रम पुढे महाराष्ट्र सरकारने अधिकृतपणे स्वीकारले. शून्य शिलकीवर बँक खाती उघडण्याची संकल्पना त्यांनी जनधन योजनेच्या सात वर्षे आधीच काटेवाडीत राबवली होती. घराच्या दारावर महिलांच्या नावाच्या पाट्या लावून त्यांनी महिलांना घराचं खरं मालक बनवलं.**

### बारामती टेक्सटाईल पार्क ते जागतिक व्यासपीठ

**बारामतीचा विकास म्हणजे केवळ रस्ते किंवा इमारती नाहीत, तर हाताला काम देणारी यंत्रणा आहे. सुनेत्रा पवार यांनी बारामती हायटेक टेक्सटाईल पार्कच्या माध्यमातून तब्बल 6000 महिलांना रोजगार मिळवून दिला. एन्व्हायर्नमेंटल फोरम ऑफ इंडियाच्या माध्यमातून त्यांनी लाखो झाडं लावली आणि जलसंधारणाची कामं केली.**

### कशा ठरल्या बारामतीच्या विकासाच्या शिलेदार?

**सुनेत्रा पवार अनेकांसाठी केवळ अजितदादांच्या पत्नी असतील, पण बारामतीकरांसाठी त्या गेल्या 41 वर्षांपासून विकासाच्या वाटेवर सोबत चालणाऱ्या खंबीर नेतृत्व आहेत.**

**अजित पवार यांच्या निधनानंतर महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रीपदाची धुरा सुनेत्रा पवार यांनी सांभाळली आहे. अनेकांसाठी त्या केवळ अजितदादांच्या पत्नी असतील, पण बारामतीकरांसाठी त्या गेल्या 41 वर्षांपासून विकासाच्या वाटेवर सोबत चालणाऱ्या खंबीर नेतृत्व आहेत.**

**धाराशिव जिल्ह्यातील तेर या ऐतिहासिक भूमीतून आलेल्या सुनेत्रावहिनींनी बारामतीच्या मातीत स्वतःला असं काही रुजवलं की, आज शरद पवार आणि अजित पवार यांच्या नावाइतकीच त्यांचीही कर्तबगारी या परिसराच्या कणाकणात दिसून येते.**

### माहेरचं बाळकडू आणि सासरची प्रयोगशाळा

**सुनेत्रा पवार यांचं माहेर धाराशिवमधील तेर गाव. वडील स्वातंत्र्यसैनिक आणि भाऊ पद्मसिंह पाटील अनुभवी राजकारणी. यामुळे समाजकारणाचे बाळकडू त्यांना घरातूनच मिळाले होते. अर्थशास्त्राची पदवी घेतलेल्या सुनेत्रावहिनी लग्न होऊन काटेवाडीत आल्या आणि त्यांनी थेट शेतात पाऊल टाकलं. 'तात्यासाहेबांची सून' म्हणून घरात न बसता त्यांनी स्वतः शेतात राबून आधुनिक शेतीचा मंत्र दिला. त्यांनी 10 हजार पक्षांची पोल्ट्री 1 लाख पक्षांपर्यंत नेली आणि दूध संकलनातही क्रांती घडवून आणली. एखादी गोष्ट हाती घेतली की ती तडीस न्यायची, हा त्यांचा स्वभाव बारामतीच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरला.**

**त्यांच्या या कार्याची दखल जागतिक स्तरावरही घेतली गेली. फ्रान्स आणि सिंगापूर येथील जागतिक उद्योजकता शिबिरात त्यांनी भारताचं प्रतिनिधित्व केलं. मेक्सिकोतील महिला खासदार परिषदेत त्यांनी महिलांच्या सुरक्षिततेबद्दल मांडलेली ठाम भूमिका भारताच्या स्वाभिमानाची साक्ष देणारी ठरली.**

### नव्या जबाबदारीतून राज्याला मोठ्या अपेक्षा

**राज्यसभेतील आपल्या अल्पशा कारकिर्दीतही त्यांनी अंगणवाडी सेविकांचे प्रश्न असोत किंवा मुळा-मुठा नदीचं प्रदूषण, प्रत्येक विषयावर पोटतिडकीने आवाज उठवला. त्यांच्या अभ्यासू वृत्तीमुळेच त्यांची निवड राज्यसभेच्या तालिका सभापतीपदी झाली. आता महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री म्हणून त्यांच्याकडे एक मोठी संधी आणि जबाबदारी आहे.**

**ज्या पद्धतीने त्यांनी काटेवाडी आणि बारामतीचा चेहरा बदलला, तसाच सकारात्मक बदल त्या संपूर्ण महाराष्ट्रात घडवून आणतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. एक संवेदनशील महिला, अभ्यासू खासदार आणि आता राज्याच्या उपमुख्यमंत्री अशा विविध भूमिकांतून सुनेत्रा पवार यांचा प्रवास महाराष्ट्राला प्रगतीची नवी दिशा देणारा ठरेल, असा त्यांच्या समर्थकांचा विश्वास आहे.**

# बदलापूर शहर पाण्याबाबत स्वयंपूर्ण

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूर बदलापूर शहराच्या पाणी पुरवठा योजनेची निविदा येत्या काही दिवसात जाहीर होणार आहे. मात्र बदलापूर शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत पाण्याची गरज अधिक आहे. त्यामुळे येत्या काळात बदलापूर नगर परिषदेला स्वतःची धरणे असावीत या हेतूने नियोजन सुरू केले आहे. बदलापुरजवळ नंबरवाडी, इंदगाव आणि चिंचवली येथे तीन लहान धरणे प्रस्तावित करण्यात आली आहेत. त्यातून येत्या काळ आत ५० ते ६० दशलक्ष लीटर पाणी मिळेल अशी माहिती आमदार किसन कथोरे यांनी दिली आहे. बदलापूर शहरातील मलवाहिनी स्वच्छता करणाऱ्या वाहनांच्या लोकार्पण कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.**



• **बदलापूर पाणीपुरवठा योजनेची निविदा लवकरच**

बदलापूर शहराच्या पाणीपुरवठा योजनेची निविदा येत्या काही दिवसांत जाहीर केली जाणार असून, ही योजना अनेक काळ रखडलेली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या योजनेला गती दिल्याची माहिती आमदार किसन कथोरे यांनी दिली.

• **वाढती लोकसंख्या आणि पाण्याची वाढती गरज**

बदलापूर शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्याने भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन केवळ विद्यमान योजनांवर अवलंबून न राहता दीर्घकालीन नियोजन आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

### तीन धरणांतून मिळणार पाणी - आ. किसान कथोरेंची ग्वाही

• **तीन लहान धरणांचा प्रस्ताव :** बदलापूर शहरासाठी अंबरनाथ तालुक्यातील नंबरवाडी, इंदगाव आणि चिंचवली या ठिकाणी तीन लहान धरणे उभारण्याचा प्रस्ताव असून, यासाठी नियोजन व पाठपुरावा सुरू असल्याचे आमदार कथोरे यांनी सांगितले.

• **५० ते ६० दशलक्ष लीटर पाण्याची उपलब्धता**

प्रस्तावित तीन लहान धरणांमुळे भविष्यात शहराला सुमारे ५० ते ६० दशलक्ष लीटर पाणी उपलब्ध होणार असून, त्यामुळे बदलापूर पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

• **मलवाहिनी स्वच्छता वाहनांचे लोकार्पण**

कुळगाव बदलापूर नगरपरिषदेला प्राप्त झालेल्या १८.५ टन क्षमतेच्या दोन अत्याधुनिक सक्शन कम जेटिंग वाहनांचे लोकार्पण नुकतेच पार पडले. या वाहनांमुळे मलवाहिनी स्वच्छतेचे काम अधिक प्रभावीपणे होणार आहे.

• **नगरपरिषद पदाधिकाऱ्यांची उपस्थिती**

या लोकार्पण कार्यक्रमास नगराध्यक्षा रुचिता घोरपडे, उपनगराध्यक्षा प्रियांका दामले तसेच पाणीपुरवठा सभापती शैलेश वडनेरे उपस्थित होते. यावेळी नव्या धरणाची मागणीही करण्यात आली.

• **पाणीपुरवठा योजनेचे काम सहा महिन्यांत मार्गी**

निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुढील सहा महिन्यांत पाणीपुरवठा योजनेचे बहुतांश काम पूर्ण होईल, त्यामुळे शहरातील पाणी समस्या मोठ्या प्रमाणात कमी होईल, असे कथोरे यांनी सांगितले.

• **राजकीय वक्तव्ये आणि टोले**

यावेळी आमदार कथोरे यांनी शहर विकासासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे सांगत शिवसेनेवर टोला लगावला. शिंदेंच्या शिवसेनेतील अनेक खरे समर्थक आजही आपल्यासोबत असल्याचे त्यांनी नमूद केले.

# ग्रामपंचायत अंजूर येथे समृद्ध पंचायतराज अभियानाचा आढावा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी ग्रामपंचायत अंजूर येथे अचानक भेट देऊन "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" अंतर्गत सुरू असलेल्या विविध उपक्रमांचा व विकासकामांचा सखोल आढावा घेतला. यावेळी गटविकास अधिकारी (भिवंडी) गोविंद खामकर, ग्रामपंचायत अधिकारी अनिल गणेश कांगणे, सरपंच छाया शाम जनाठे, उपसरपंच हरेश मुरलीधर नाईक, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या भेटीदरम्यान ग्रामपंचायत अधिकारी अनिल कांगणे यांनी अभियानाबाबत सविस्तर माहिती सादर केली. अभियानाच्या सात घटकांवर चर्चा करून अंजूर ग्रामपंचायतीत राबविण्यात आलेल्या विकासकामांचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी विशेष कौतुक केले. तसेच अभियानांतर्गत अधिकाधिक गुण मिळविण्यासाठी नियोजनबद्ध अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या.

ग्रामपंचायत समिती सदस्यांनी यावेळी विविध नागरी समस्यांकडे लक्ष वेधले. अंजूर हद्दीतील काही नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी मुख्य जलवाहिनीवरून टॅपिंगची मागणी करण्यात आली. घनकचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देणे, ग्रामपंचायत कार्यालयासमोरील जागेबाबत

**मुख्य कार्यकारी अधिकारी यादव यांनी घनकचऱ्याचे योग्य विलगीकरण, खतनिर्मिती, सुका कचरा रिसायकलिंग तसेच लोकसहभाग वाढविण्यावर भर देण्याचे निर्देश दिले.**

निर्णय घेणे तसेच मुंबई–अहमदाबाद हायस्पीड रेल्वे प्रकल्पामुळे बाधित झालेल्या क्रिकेट मैदानाच्या बदल्यात नवीन क्रीडांगण देण्याची मागणीही करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यादव यांनी घनकचऱ्याचे योग्य विलगीकरण, खतनिर्मिती, सुका कचरा रिसायकलिंग तसेच लोकसहभाग वाढविण्यावर भर देण्याचे निर्देश दिले. यानंतर त्यांनी ग्रामपंचायत अंजूर येथे मंजूर झालेल्या पंचायत प्रशिक्षण केंद्राची (PLC) पाहणी करून समाधान व्यक्त केले तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रालाही भेट देत कामकाजाचा आढावा घेऊन कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.



## व्यावसायिकांची २.११ कोटींना फसवणूक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** गारमेंटचा व्यवसाय करणाऱ्या १० जणांची दोन कोटी ११ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी भांडुप पोलिसांनी मेसर्स आध्या इंटरनॅशनल, मेसर्स ए.एस.पी. एक्सपोर्ट आणि मेसर्स एसएफएक्स या कंपन्यांचे मालक आणि व्यवस्थापकांविरुद्ध गुन्हा दाखलकेला आहे. परदेशात प्रसिद्धी मिळवून देण्याचे तसेच स्थानिक बाजारभावापेक्षा जास्त मोबदला देण्याचे प्रलोभन दाखविले.

# पहिली महिला अंतराळवीर कल्पना चावला




आज १ फेब्रुवारी, भारतीय वंशाची अमेरिकन अंतराळवीर कल्पना चावला यांचा स्मृतिदिन. २३ वर्षापूर्वी त्यांच्या कोलंबिया या यानाला पृथ्वीवर परत येत असताना अपघात होऊन त्यात त्यांचा दुर्दवी मृत्यू झाला. त्यांच्या सोबत सहा अंतराळवीरांचा चमू देखील होता त्यांचा देखील या अपघातात दुर्दैवी अंत झाला. कल्पना या अंतराळात जाणाऱ्या भारतीय वंशाच्या पहिल्या महिला अंतराळवीर होत्या . त्यांचा जन्म १७ मार्च १९६२ रोजी हरयाणातील कर्नाल येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बनारसीलाल चावला तर आईचे नाव संयोगीता असे होते. त्यांच्या वडिलांचा औद्योगिक वस्तू निर्मितीचा व्यवसाय होता आणि आई गृहिणी होती. कल्पना चावला यांचे शालेय शिक्षण टागोर बाल निकेतन या विद्यालयात झाले. अभ्यासात हुशार असणाऱ्या कल्पना चावला यांनी १९८२ साली पंजाब विद्यापीठातून एरोनिटीकल अभियांत्रिकी पदवी मिळवली. त्यांनी १९८४ साली अमेरिकेच्या टेक्सास विद्यापीठातून एरोनिटीकल उच्च अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून कोलोरॅडो विद्यापीठातून एरोस्पेस अभियांत्रिकी विभागातून १९८८ साली डॉक्टरेट पदवी प्राप्त केली. त्यांचे अंतराळवीर होण्याचे स्वप्न होते. ते पूर्ण करण्यासाठी त्या नासा या अमेरिकेतील अंतराळ संशोधन संस्थेत भरती झाल्या. १९८८ मध्ये त्यांनी नासातील एम्स रिसर्च सेंटर ओव्हरसेट मेथडसच्या उपाध्यक्षा म्हणून काम पाहिले. तिथे त्यांनी कॉम्प्युटीशनल फ्ल्यूईड डायनॅमिकमध्ये जागेवरच उभे उड्डाण आणि जमिनीवर उतरणे या विषयांवर संशोधन केले. त्यानंतर त्यांना ग्लायडर्स, सीप्लेन्स तसेच एक किंवा अनेक इंजिन असलेली विमाने याच्या व्यावसायिक वैमानिकांना प्रशिक्षण देण्याचा परवाना मिळाला. १९९१ साली त्यांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळाले. नागरिकत्व मिळाल्यावर त्यांनी १९९५ साली नासामध्ये अस्ट्रोनोट कॉर्प्स होण्यासाठी अर्ज केला. त्यांना त्यासाठी नासाने त्यांना प्रवेशही दिला. त्यांची मार्च १९९६ मध्ये पहिल्या उड्डाणासाठी निवड झाली. त्यांची पहिली अंतराळ मोहीम १९ नोव्हेंबर १९९७ रोजी चालू झाली. त्यांनी अंतराळात १०.६७ दशलक्ष किमी प्रवास केला. हे अंतर २५२ वेळा पृथ्वीला प्रदक्षिणा घालण्याऐवढे होते. कल्पना चावला यांना २००० साली त्यांच्या दुसऱ्या उड्डाणासाठी एसटीएस १०७ साठी देखील निवड झाली परंतु ही मोहीम तांत्रिक अडचणीमुळे लांबली जात होती. त्या १६ जानेवारी २००३ रोजी एसटीएस १०७ मोहिमेसाठी जाण्यासाठी कोलंबिया अंतराळ मोहिमेवर आल्या. या मोहिमेत कल्पना चावला यांना सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात प्रयोग करणे ज्यामध्ये ते आणि त्यांच्या चमुला ८० प्रयोग करावयाचे होते त्यात पृथ्वी आणि अंतराळ विज्ञान, अद्ययावत तंत्रज्ञान निर्मिती अंतरळवीरांचे आरोग्य आणि सुरक्षा या विषयांचा समावेश होता. आपली मोहीम फत्ते करून १ फेब्रुवारी २००३ रोजी हे अंतराळ यान कोलंबियाच्या टेक्सास येथे पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताना आणि जमिनीवर उतरताना दुर्दवी अपघात झाला. या दुर्दवी अपघातात कल्पना चावला आणि त्यांच्या चमुचा दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या मृत्यूनंतर जगभर हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यांना मरणोत्तर काँग्रेशनल स्पेस सेवा पदक, नासा स्पेस फ्लाईट तसेच नासा विशेष सेवा पदकाने गौरविण्यात आले. जगभरातील विविध विद्यापीठांनी त्यांच्या नावे विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्या जाहीर केल्या. ५ फेब्रुवारी २००३ साली भारताच्या पंतप्रधानांनी हवामान विषयीच्या उपग्रहाला कल्पना १ हे नाव दिले. त्यानंतर सोडण्यात आलेल्या उपग्रहालाही कल्पना २ हे नाव देण्यात आले. हरियाणा सरकारने कल्पना चावला यांच्या नावाने ज्योतिसार, कुरुक्षेत्र येथे प्लेनेटेरियम सुरू केले. नासाने सुपर कॉम्प्युटरला कल्पना चावला यांचे नाव दिले. कल्पना चावला यांनी आपल्या धैर्य, चिकाटी, जिद्द आणि बलिदानाने देशाचे नाव उज्वल केले. कल्पना चावला या आज आपल्यात नसल्या तरी त्यांच्या स्मृती आजही आपल्या मनात कायम आहे. कल्पना चावला यांचे कार्य आजच्याच नाही तर येणाऱ्या पिढीसाठीही प्रेरणादायी आहे. पहिल्या महिला अंतराळवीर कल्पना चावला यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## मोहने येथे अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** मोहोने येथे सर्व राजकीय पक्ष. सामाजिक शैक्षणिक सहकार क्षेत्रातील पदाधिकारी. व कार्यकर्ते यांनी उपस्थित राहून महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली. या श्रद्धांजली सभेचे आयोजन पुणे जिल्हा रहिवाशी संघ मोहोने यांनी केले होते.

यावेळी जे सी. कटारिया, विजय काटकर, अण्णा राजगुरू, मुकुंद कोट, राजेश वाघमारे, दासू ठोंबे, वासुदेव पाटील, जनार्दन पाटील, रमेश रोकडे, नामदेव लोखंडे, माया कटारिया, संध्या साठे, दशरथ तरे, अरुण भोईर, एस बी शुक्ला, नाना काटकर, लक्ष्मण तरे, नारायण पाटील, भाऊ शिंदे, जनार्दन पाटील, जयेश पाटील, हनुमान जगताप, दशरथ सुक्रे, सोनवणे, किरण शिंदे, तुषार भालेराव, सचिन भुजबळ, संजय शेळके या सह अनेक मान्यवर व अजित पवार प्रेमी नागरिक उपस्थित होते.

यावेळी अजित पवार यांना श्रद्धांजली वाहताना राष्ट्रवादीचे नेते तथा माजी नगरसेवक जे. सी. कटारिया यांनी सांगितले कि, श्रद्धांजली साठी शब्द नाहीत, फक्त अश्रू आहेत. अजित दादा आमच्या जिवाभावाचा माणूस. कार्यकर्त्यांच्या पाठीवर हात ठेऊन बळ देणारा नेता. सहा वेळा उप मुख्यमंत्री या काळात महाराष्ट्र राज्याचे हिताचे अनेक धाडसी निर्णय त्यांनी घेतले. अर्थ मंत्री काळात आर्थिक नियोजन पूर्वक अर्थ संकल्प मांडून विकासाला चालंना दिली. कार्यक्षम नेता, स्पष्ट वक्ता याच बरोबर दादा म्हणजे कामाचा माणूस आणि विमान प्रवासात ही सर्व सामान्य माणसांसाठी काम करायचे. विमान दुर्घटना झाली.स्फ़ोट झाला आणी सर्व सामान्य माणसांनी दिलेले अर्जबाहेर आले. बारामतीच्या ओसाड भागात नंदनवन फुलविले त्याच भूमीत समरस झाले. ते खऱ्या अर्थाने लोकनेते होते. अंतिम विधी वेळी या नेत्याचे अखेरचे दर्शन घेण्यासाठी जमलेला जन समुदाय म्हणजे त्यांची लोकप्रियता होती असे कटारिया यांनी सांगितले.

## भाजपा वाहतूक संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** भाजपा वाहतूक संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा कल्याण पश्चिमेतील सिद्धिविनायक हॉल येथे शुक्रवारी पार पडली. यावेळी वाहन चालकांना संबंधित कायद्याची काही माहिती व्हावी म्हणून काही विभागाचे अधिकारी यांना मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित केले होते.

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना माजी आमदार नरेंद्र पवार व आरटीओ विभागाचे सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक कुलपे यांच्या हस्ते पुष्पहार घालून तसेच प्रथम उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नरेंद्र पवार, आरटीओ विभागाचे कुलपे, अंबरनाथ नगरपरिषद नगरसेविका सुजाता भोईर, संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विल्सन काळपुंड, महाराष्ट्र सरचिटणीस राजू बेग, रिक्षा टॅक्सी संघर्ष कृती समिती कल्याणचे अध्यक्ष महेंद्र मिश्रा, उपाध्यक्ष मोहन पाठारे उपस्थित होते.

टेम्पो विभागाचे शहाजी सावंत, मुरबाड टॅक्सी विभागाचे सुदाम रोहने, पडघा टॅक्सी विभागाचे महादेव लंबे, प्रमोद पाटील, अनिल तिवारी, आळेफाटा विभागाचे अशोक साबळे, कल्याण रिक्षा विभागाचे चंद्रकांत वडतिल्ले, अंबादास पारसे, संजय मोरे, इस्माईल शेख, रमजान शेख, सतीश मिटकरी, महादेव गायकवाड, धनाजी फनाडे, उमेश गठडी, संदीप पाटील, जयेश पाटील, परदेसी, अंबरनाथ रिक्षा विभागाचे निवृत्ती जगदाळे आदींनी या कार्यक्रमाला मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजीत गायकवाड यांनी केले.

## ग्रामीण ते शहरी नागरिकांपर्यंत सायबर सुरक्षेचा संदेश “आजची जागरूकता, उद्याची सुरक्षा!”

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** बी. के. बिर्ला नाईट कॉलेज, कल्याण येथील सायबर दृष्टी सेल यांच्या विद्यमाने नागरिकांमध्ये डिजिटल सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेचा उद्देश नागरिकांना युपिआय व नेट बँकिंगचा सुरक्षित वापर, ओटीपी व लिंक फ्रॉडपासून संरक्षण, बनावट कॉल-मेसेज ओळखणे, सोशल मीडिया सुरक्षितता, पासवर्ड संरक्षण तसेच चाटजीपीटी सारख्या एआय साधनांचा योग्य वापर याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन देणे हा आहे.




या डिजिटल साक्षरता प्रवासाची सुरुवात एनएसएस शिबिरांतर्गत रुंदे व अंबिवली गावात करण्यात आली. या ठिकाणी शालेय विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांना प्रत्यक्ष मोबाईल वापरून युपिआय सेट-अप, फसव्या लिंक कशा ओळखायच्या, कॉल फ्रॉडची उदाहरणे, सायबर फसवणूक झाल्यास कुठे व कशी तक्रार करावी, तसेच फोन हरवल्यास घ्यावयाची तात्काळ पावले याची माहिती देण्यात आली.

यानंतर काळा तलाव, कल्याण (पश्चिम) येथे सकाळी दोन सत्रांमध्ये सायबर जागरूकता उपक्रम राबविण्यात आला. येथे नागरिकांशी थेट संवाद साधत क्यूआर कोड स्कॅम, ओटीपी शेअरिंगचे धोके, सोशल मीडिया हॅकिंगपासून संरक्षण, सुरक्षित पासवर्ड तयार करण्याच्या पद्धती तसेच चाटजीपीटी सारख्या आधुनिक एआय साधनांचा शैक्षणिक व दैनंदिन जीवनातील उपयोग सोप्या भाषेत समजावून सांगण्यात आला.पुढील टप्प्यात डी मार्ट, वसंत व्हॅली, खडकपाडा तसेच राणी लक्ष्मीबाई उद्यान, सिंडिकेट परिसरात नागरिकांसाठी सायबर जागरूकता सत्रांचे आयोजन करण्यात आले. बाजारपेठ व सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या नागरिकांना युपीआय व्यवहार करताना आवश्यक खबरदारी, बनावट ॲप्स व लिंक ओळखणे, फोन हरवल्यास घ्यावयाची तात्काळ पावले, तसेच “सायबर सेफ्टीच्या सात सवयी” प्रत्यक्ष उदाहरणांसह समजावून सांगण्यात आल्या.

या सर्व उपक्रमांदरम्यान सायबर दृष्टी सेलच्या टीमने लाईव्ह डेमो, प्रश्नोत्तर सत्र, प्रत्यक्ष केस-स्टडी उदाहरणे आणि वैयक्तिक मार्गदर्शन देत नागरिकांशी थेट संवाद साधला. त्यामुळे नागरिकांना केवळ माहितीच नव्हे तर प्रत्यक्ष वापरात येणारे उपाय मिळाले. या मोहिमेचे नेतृत्व विद्यार्थी समन्वयक लक्ष्मी सिंह व प्रसाद जावळे यांनी केले. मुख्य कार्यसंघात दिव्या नायर, प्राची चौहान, यशराज गायकवाड, मुरतझा सेवक, वेदांग सगभोर, वेदिका केणी, सेजल भिलारे, प्रांशू मिश्रा, अथर्व जाधव, सुभश्री पाधी, आदित्य मिश्रा तसेच इतर विद्यार्थ्यांनी विशेष योगदान दिले.या उपक्रमांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बिपिनचंद्र वडेकर व शिक्षक समन्वयक डॉ. रुपेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी डिजिटल सुरक्षितता ही आजच्या काळाची गरज असल्याचे नमूद करत विद्यार्थ्यांच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. या मोहिमेमुळे अनेक नागरिकांमध्ये डिजिटल व्यवहारांबाबत आत्मविश्वास निर्माण झाला असून सायबर फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक सजगता वाढल्याचे सहभागी नागरिकांनी सांगितले.

भविष्यात सायबर दृष्टी सेलकडून ही मोहीम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार असून पुढील टप्प्यात पोलीस स्टेशन, उल्हासनगर, वसिंद, आसनगाव, केडीएमसी परिसर, हिवरे बाजार, टिटवाळा मंदिर परिसर, शहरी वसाहती तसेच ग्रामीण समुदायांमध्ये डिजिटल साक्षरता व सायबर जागरूकतेचे उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम म्हणजे नागरिकांना डिजिटल जगात सुरक्षित, सजग आणि आत्मनिर्भर बनविण्याचा प्रभावी सामाजिक प्रवास असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## उत्तर भारतीय समाजाचे परिश्रमामुळेच समाजात वेगळे स्थान - आ.संजय उपाध्याय

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी शहरात सामाजिक संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उत्तर भारतीय समाज सेवा संस्थेचे अध्यक्ष श्रीकृष्णगोपाल सिंह ठाकूर यांच्या पुढाकार शहरातील मानसरोवर येथील महाराजा मैदानात उत्तर प्रदेश स्थापना दिवस मोठ्या उत्साहात नुकताच संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील,आमदार संजय उपाध्याय,आ.महेश चौगुले, माजी आमदार रूपेश म्हात्रे, माजी उपमहापौर मनोज काटेकर, यादव संघ मुंबईचे अध्यक्ष अजय यादव, जेष्ठ नगरसेवक,सुमित पाटील, निलेश चौधरी,बाळाराम चौधरी,पत्रकार गुरूप्रसाद सिंह,पी. डी.यादव,अँड.प्रविण मिश्रा,आचार्य सुरजपाल यादव यांच्यासह मान्यवर नगरसेवक,महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.उत्तर प्रदेश आज देशात एक समृद्ध राज्य म्हणून उदयास येत आहे येथील नागरिक हे कष्ट करून व मेहनतीने आपली प्रगती करीत आहेत. आपली संस्कृती व भाईचारा टिकवून एकोप्याने राहत आहेत ही कौतुकास्पद बाब आहे असे गौरवशाली मत माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी व्यक्त केले.उत्तर प्रदेश स्थापना दिवस साजरा होत असताना स्वाभिमान, संस्कृती आणि एकतेचा संगम दिसून आला आहे ही आनंदाची बाब आहे. या कार्यक्रमात शेकडो उत्तर भारतीय पुरुष,महिला आणि युवक सहभागी झाले आहेत.उत्तर भारतीय समाजाने आपल्या कठोर परिश्रम आणि समर्पणाने जागतिक स्तरावर स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे ती टिकवून ठेवावी आणि आनंदाने रहावे असे आवाहन मुंबई बोरीवलीचे आमदार संजय उपाध्याय यांनी यावेळी केले. सदर कार्यक्रमात उत्तर भारतीय समाज सेवा संस्थेचे अध्यक्ष कृष्णगोपाल सिंह ठाकूर यांनी स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ आणि टॉवेल देऊन पाहुण्यांचा व गुणवंत नागरिकांचा सत्कार केला यावेळी उपस्थित नागरिकांसाठी भोजपुरी गायन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.शेकडो महिला व नागरिक या कार्यक्रमास उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्तर भारतीय समाज सेवा संस्थेचे पदाधिकारी व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

## श्रीकृष्ण मंदिर वर्धापन दिनानिमित्त भिवंडीत ब्रह्मोत्सव पालखी सोहळा संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी शहरातील पारनाका बाजारपेठ परिसरात असलेल्या पुरातन श्री गोपाल कृष्ण मंदिराचा 61 व्या वर्धापन दिवस धार्मिक कार्यक्रम आयोजित करीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या निमित्ताने मंदिरात तीन दिवसांचा ब्रह्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला महिलासह नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

भिवंडी शहरातील मध्यवर्ती भागात असलेले पुरातन श्री गोपाल कृष्ण मंदिर हे भाविकांचे श्रध्दास्थान म्हणून ओळखले जात असुन यंदा या मंदिरास 61 वर्षे झाल्याने वर्धापन दिनानिमित्त मंदिरात होम हवन, मंत्र पठण, भजन, कीर्तन व महाआरती सारखे धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

ब्रह्मोत्सव सोहळा निमित्त कार्यक्रम व पालखी सोहळ्यात श्री गोपाल कृष्ण मंदिर ट्रस्टचे देवकिशन करवा, अविनाश सिकची,नवल करवा, रामेश्वर काकांनी तसेच माहेश्वरी, महाराष्ट्रीयन, गुजराती, मारवाडी पटेल अग्रवाल इत्यादि समाजांचा उस्फूर्त सहभाग होता.शुक्रवारी सायंकाळी मंदिरातून ढोल ताशांच्या गजरात वाजतगाजत नाम स्मरण करत महिला नागरिकांनी भाविकांचे उपस्थितीत गोपाल कृष्ण प्रतिमेचे नगरभ्रमण पालखी चे आयोजन करण्यात आली ब्राह्मण आळी बाजारपेठ पेठ परिसरातून निघालेल्या पालखी सोहळयात भाविक उस्फुर्तपणे सहभागी झाले होते. ब्रह्मोत्सव धार्मिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री गोपाल कृष्ण मंदिर ट्रस्टचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी मेहनत घेतली.पालखी पश्चात होम पूर्णाहुतिने व शांती उत्सवाने सोहळ्याची सांगता झाली.



## भविष्यवेध



शनिवार
०१ फेब्रुवारी २०२६

**मेष**
ताजेतवाने वाटू शकते. यश हातातोंडाशी येण्याची शक्यता वाटताना आपली ताकद कमी होत जाण्याची भावना निर्माण होईल. निराशाजनक आर्थिक परिस्थितीमुळे काही महत्त्वाच्या कामामध्ये खंड पडू शकतो.

**वृषभ**
दिवस उत्तम जाईल. आपल्या मित्रांना रात्रीचे जेवण आणि नृत्यासाठी बाहेर घेऊन जाण्यापूर्वी विचार करा. कार्यात यश मिळविण्यासाठी आपले मत ठामपणे मांडा. मित्रांच्या सहाय्याने अनुकूलता वाढेल.

**मिथुन**
व्यापार व प्रणयाच्या क्षेत्रात यश मिळेल. प्रिय व्यक्तीबरोबर संवाद होईल. आवश्यक कार्य देखील पूर्ण होतील. मित्रांचा अनुकूल सहयोग मिळेल. आपल्या आपल्या नातलागांची व मित्रांची चांगली भेट होईल.

**कर्क**
जे लोक बऱ्याच दिवसापासून खूप व्यस्त होते त्यांना आज स्वतःसाठी वेळ मिळू शकतो. वादविवाद किंवा कार्यालयातील राजकारण, तुम्ही या सगळ्याला पुरून उराल. हसत खेळत वेळ खर्च होईल.

**सिंह**
लाभ प्राप्तिचा योग. व्यापारातील आर्थिक त्रासाला संयमाने सोडवच्याचा प्रयत्न करा. निवेश प्रत्याशित.आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये.

**कन्या**
घरगुती कामं बराच काळ व्यस्त ठेवतील. धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. अनियोजित माध्यमातून मिळणारे पैसे तुमचा दिवस उजळून टाकतील.

**तुळ**
जीवनात ध्येयावर लक्ष द्या पूर्ण विश्वासाने त्याच्या प्राप्तीचा प्रयत्न करा.व्यापारात कार्यक्षेत्राचा विकास, व्यापारिक बाधा येऊ शकतात. आय पेक्षा व्यय अधिक असल्याने आर्थिक तंगीची आशंका.

**वृश्चिक**
आपल्या व्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा. आजचा दिवस व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. जुनी कामे झाल्यामुळे उत्साह आणि प्रसन्नता वाटेल.

**धनु**
व्यापार-व्यवसाय सहज राहील. कौटुंबिक सभासदांचा सहयोग मिळेल. यात्रा घडू शकते. अडकलेला पैसा मिळाल्याने आनंद वाटेल. कौटुंबिक चिंता दूर होईल. व्यावसायिक स्थिति चांगली राहील.

**मकर**
बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागेल. आर्थिक विषयांमध्ये सावगिरी बाळगा. सुख-शांतीचे वातावरण राहील. हसत खेळत वेळ खर्च होईल.

**कुंभ**
आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये. आपल्या ्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा. महत्वपूर्ण कार्यांवर व्यय होईल.

**मीन**
तटस्थ भूमिका घेणे, प्रगतिवर्धक बातम्या मिळतील. मुलांची उन्नति प्रसन्नता देईल. आधी केलेल्या कामाचे फळ मिळेल. बिघडलेले संबंध सुधारतील.नवीन जोखिम असलेली कार्ये टाळा.

## अंत्योदय लाभार्थ्यांना मिळणार साखर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**वासिंद :** अंत्योदय लाभार्थ्यांना रेशनिंग दुकानात फेब्रुवारीच्या वाटपात साखर मिळणार आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या वतीने जिल्हा पुरवठा विभागाच्या माध्यमातून येत्या फेब्रुवारी महिन्याच्या वाटपाबरोबर २० रुपये किलो दराने १ किलो साखर मिळणार आहे.



शहापूर तालुक्यात १७१ रेशनिंग दुकानदार असून यामध्ये १७ हजार ४४४ इतके अंत्योदय लाभार्थी आहेत.

# गणेशपुरीतील समाजसेवक रामूकाका नाईक यांचे दुःखद निधन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबाडी** : भिवंडी तालुक्यातील गणेशपुरी येथील स्वामी नित्यानंद बाबा यांचे परमभक्त, ज्येष्ठ समाजसेवक व शिक्षणप्रेमी व्यक्तिमत्त्व रामचरण उर्फ रामूकाका नाईक यांचे निमोनिया या आजारामुळे भिवंडीतील श्रीवर्धन हॉस्पिटल, धामणकर नाका येथे उपचार सुरू असताना शुक्रवार दि. ३० जानेवारी २०२६ रोजी रात्री ११.१५ वाजता, वयाच्या ७१ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात भाचा किरण शालियान, बहिणी पद्मावती, सुभद्रा व त्यांचे कुटुंबीय असा मोठा परिवार आहे.

मूळचे कर्नाटक राज्यातील कुंदापूर–सिद्धापूर येथील रहिवासी असलेले रामूकाका नाईक यांचे कुटुंब गेल्या तीन पिढ्यांपासून गणेशपुरी येथे वास्तव्यास आहे. स्वामी नित्यानंद



कै. श्री. रामचरण नाईक (रामू मामा)
जन्म: १६/१२/१९५५ मृत्यू: ३०/०१/२०२६

बाबा यांचे वास्तव्य कर्नाटकात असल्याने बाबांच्या गणेशपुरी येथील पुण्यभूमीतच रामूकाका यांचे जीवन घडले. बाबांच्या सान्निध्यात त्यांचे बालपण गेले असून बाबांच्या सेवेत त्यांनी आयुष्य वाहिले, अशी माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली. स्वामी नित्यानंद बाबा यांनी ग्रामीण व गरीब विद्यार्थ्यांसाठी शालेय इमारती उभारून शिक्षणाची गंगा सुरू केली. त्याच सेवाव्रताचा वारसा पुढे नेत रामूकाका नाईक यांनी गणेशपुरी तसेच आजूबाजूच्या भागातील प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, अन्नधान्य, कपडे, खाऊ, भोजन तसेच काही ठिकाणी शालेय सुविधा उपलब्ध करून दिल्या. गरजू विद्यार्थ्यांसाठी त्यांची मदत सातत्यपूर्ण व निस्वार्थ होती.

रामूकाका नाईक यांच्या निधनामुळे गणेशपुरी व परिसरातील शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात मोठी हानी झाली असून, सेवाभावी व शिक्षणासाठी तळमळ असलेले व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी परिसरातील विविध क्षेत्रांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या लाडक्या व आदरणीय रामूकाकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# महाराष्ट्र पोलिस कर्मचाऱ्याने धाकट्या भावासाठी यकृतदान करून वाचवले प्राण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : धैर्य, त्याग आणि अटूट बंधुत्वाची हृदयस्पर्शी कहाणी समोर आली आहे. महाराष्ट्र पोलिस दलातील एका कर्मचाऱ्याने आपल्या धाकट्या भावाचा जीव वाचवण्यासाठी स्वतःच्या यकृताचा (लिव्हरचा) एक भाग दान केला. शौर्य नेहमी रस्त्यावरच दिसते असे नाही, कधी कधी ते ऑपरेशन थिएटरमध्येही घडते, याची ही जिवंत साक्ष आहे. ही जीवनदायी यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया मुंबई सेंट्रल येथील वोक्हार्ट रुग्णालयात डॉ. स्वप्निल शर्मा यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे पार पडली.३८ वर्षीय धाकटा भाऊ नित्यानंद रोकडे अत्यंत गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल झाला होता. त्याला तीव्र 'अक्यूट-ऑन-क्रॉनिक लिव्हर फेल्युअर'चा त्रास होता. तीव्र पिवळेपणा, व्हेंटिलेटरवरील अवलंबित्व आणि रक्तदाब टिकवण्यासाठी औषधांची गरज अशी त्याची प्रकृती होती. त्याच्या जगण्याची एकमेव आशा म्हणजे तातडीचे यकृत प्रत्यारोपण. क्षणाचाही विलंब न लावता, महाराष्ट्र पोलिस दलात कार्यरत असलेला त्याचा मोठा भाऊ संतोष रोकडे जिवंत दाता म्हणून पुढे सरसावला.

दाता भावाने सांगितले, "पोलिस म्हणून आम्हाला इतरांचे प्राण वाचवण्याचे प्रशिक्षण दिले जाते — स्वतःचा धोका पत्करूनही. पण यावेळी ती वर्दी किंवा कर्तव्याची बाब नव्हती; तो माझा धाकटा भाऊ होता. जर मी त्याला आयुष्याची दुसरी संधी देऊ शकत असेन, तर माझ्या मनात कोणताही प्रश्न नव्हता. त्यानेही माझ्यासाठी हेच केले असते." सखोल वैद्यकीय तपासणीनंतर मोठा भाऊ दानासाठी योग्य असल्याचे आढळले. शस्त्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची होती, परंतु ती यशस्वीरीत्या पूर्ण झाली. यासाठी शल्यविशारद, भूलतज्ज्ञ, अतिदक्षता तज्ज्ञ, रेडिओलॉजिस्ट, विशेष प्रशिक्षित आयसीयु परिचारिका, आहारतज्ज्ञ आणि फिजिओथेरपिस्ट अशा बहुविद्याशाखीय लिव्हर ट्रान्सप्लांट पथकाने काटेकोर समन्वय साधला.

डॉ. स्वप्निल शर्मा म्हणाले, "अक्यूट-ऑन-क्रॉनिक लिव्हर फेल्युअरमध्ये लिव्हर ट्रान्सप्लांट ही आमच्यासाठी सर्वात आव्हानात्मक शस्त्रक्रियांपैकी एक असते. या प्रकरणात केवळ वैद्यकीय गुंतागुंत नव्हे, तर दोन भावांचे असामान्य भावनिक बळही ठळकपणे दिसून आले. प्रेम, त्याग आणि विज्ञान यांनी एकत्र येत मृत्यूवर मात केलेली ही दुर्मीळ घटना आहे."आता प्रकृतीत हळूहळू सुधारणा होत असलेला धाकटा भाऊ भावूक होत म्हणाला,"मी माझे आयुष्य माझ्या भावाला देणे लागतो. आम्ही दोघांनी एकच वर्दी घातली आहे, पण यावेळी त्याने मला पोलिस म्हणून नाही, तर कुटुंबातील सदस्य म्हणून वाचवले. हे ऋण मी कधीही फेडू शकणार नाही."

सध्या दोन्ही भाऊ प्रकृती सुधारण्याच्या मार्गावर आहेत — एक पुन्हा निरोगी आयुष्याकडे, तर दुसरा पुन्हा कर्तव्यावर रुजू होण्याच्या तयारीत. यकृत प्रत्यारोपणातील आधुनिक वैद्यकीय प्रगती आणि मानवी धैर्य यांची सांगड घातल्यास नियतीलाही बदलता येते, याचे हे जिवंत उदाहरण आहे. ही उल्लेखनीय घटना भारतातील वाढत्या लिव्हर ट्रान्सप्लांट क्षमतेसोबतच मानवी नात्यांच्या सामर्थ्याचीही जाणीव करून देते. वैद्यकीय उत्कृष्टता, योग्य वेळी केलेला हस्तक्षेप आणि भावाने केलेला असामान्य त्याग — या सर्वांनी मिळून एक जीव वाचवला. काही सर्वात मोठी शौर्यकृत्ये टाळ्यांच्या गजरात नव्हे, तर प्रेमाने प्रेरित शांत कृतीतून घडतात, याची ही प्रेरणादायी आठवण आहे.

# कल्याण डोंबिवलीतील विद्यार्थी नासा आणि इस्त्रोमध्ये जातील – संतोष डावखर

## डावखर ग्रुपच्या वतीने आंतर शालेय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी संतोष डावखर आणि सहकारी 2014 पासून विविध विषयांवर आधारित प्रदर्शनाचे आयोजन करत आहेत. दर वर्षी अंदाजे 25 हजारहुन अधिक विद्यार्थी या ठिकाणी भेट देतात. पुन्हा एकदा विद्यार्थ्यां मधील कला गुणांना संधी देण्यासाठी त्यांच्यातल्या शास्त्रज्ञांना वाव देण्यासाठी कल्याण डोंबिवली परिसरातील विद्यार्थ्यांसाठी आंतर शालेय विज्ञान प्रदर्शन तसेच ऐतिहासिक मुद्रांक कागदपत्रे, नाणी आणि चलन प्रदर्शन29 व 30 जानेवारी रोजी रीजन्सी अनंतम, डोंबिवली (पूर्व) येथे सकाळी 10 ते संध्याकाळी 8 या वेळेत आयोजित करण्यात आले आहे.

सदरचे प्रदर्शन हे सर्वांसाठी विनामूल्य आहे. आयोजकांनी शाळांसाठी बसची सेवा देखील उपलब्ध करून दिलेली आहे. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना विज्ञाना बद्दल संपूर्ण माहिती




घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. विद्यार्थ्यांना विज्ञान विषयामध्ये स्वारस्य घेण्यास प्रवृत्त करण्यासाठी विशेष आंतरशालेय विज्ञान प्रदर्शन आयोजित केले आहे. जिंकणाऱ्या शिक्षकांना व विद्यार्थ्यांना रोख, पारितोषिक, विशेष प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या वर्षी 50 हुन जास्त शाळा सहभागी झाल्या असल्याची माहिती संतोष डावखर यांनी दिली.

गेली अनेक वर्षे संतोष डावखर आणि रिजेन्सी ग्रुप यांच्या साकार्याने विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात येत असून कल्याण डोंबिवली परिसरातील अनेक शाळातील विद्यार्थी सहभागी होतात. तेच हे प्रदर्शन बघण्यासाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी गर्दी करतात. यंदा याठिकाणी एआय तंत्रज्ञान, सोलर असे अनेक प्रयोग आले असून एआयमुळे विद्यार्थ्यांना माहिती गोळा करणे सोपे झाले आहे. यातून त्यांना नवनवीन कल्पना सुचत असतात, नवीन शोध लावत असतात. हे शोध मांडण्यासाठी या प्रदर्शनाचा उपयोग होत असून यातूनच नासा अथवा इस्रो मध्ये कल्याण डोंबिवलीतील शास्त्रज्ञ नक्की जातील असा विश्वास संतोष डावखर यांनी व्यक्त केला.

# दुर्गाडी किल्ल्याच्या पायऱ्यांवर आढळलेल्या कोब्रा नागास सर्पमित्राचे जीवनदान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील दुर्गाडी किल्यावरील दुर्गाडी माता मंदिराकडे जाणाऱ्या मध्यभागातील पायरी परिसरात आढळलेल्या कोब्रा नागास सर्पमित्राने पकडून जीवदान दिल्याची घटना गुरूवारी दुपारी घडली.सर्प मित्र दत्ता बोंबे यांनी दिलेल्या माहितीनुसार दुर्गाडी माता मंदिराकडे जाणाऱ्या मध्यभागातील पायरी परिसरात गुरुवारी दुपारी साडेपाच फुटी लांब कोब्रा नागाची आणि मंगुस यांची झुंज रंगली होती.

दरम्यान तिथे किल्ले दुरुस्ती काम करणारे कामगार पोहचले त्यांची चाहूल लागल्याने



मंगूस पळून गेले. त्या नागाचा रूद्र अवतार पाहता मंजुराची भितीने त्रेधातिरपीट उडाली. प्रसंगावधान पाहत सुरक्षा कर्मचारी मोरे यांनी सर्पमित्र दत्ता बोंबे यांच्याशी संपर्क साधला असता तातडीने घटनास्थळी पोहचत सर्पमित्र दत्ता बोंबे यांनी साडेपाच फुटी लांब विषारी कोब्रा नागास पकडून जीवदान दिल्याचे पाहता उपस्थितांनी सुटकेचा निश्वास टाकला. सर्पमित्र दत्ता बोंबे यांनी सांगितले की, गारव्यामुळे साप उन्हाची तिरिपसाठी दगडी पायरी परिसरात उबीसाठी आला असावा. संदर्भीत पकडलेल्या विषारी नागास जीवनदान देत नैसर्गिक अधिवासात सोडले. ही घटना पाहता भक्तांनी देखील मंदिर परिसरात जाता येताना लक्ष देत मार्गाक्रमण गरजेचे आहे.

# डंपरच्या धडकेत महिलेचा मृत्यू

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पश्चिमेतील गंधारी पूलाजवळ एका डंपरने दुचाकीला दिलेल्या धडकेच्या अपघातात एका महिलेचा मुत्यु झाल्याची दुर्दैवी घटना घडली. कल्याण नजीक शनिवारी रात्री बापगावहून कल्याणच्या दिशेने येत असताना गांधारी पूलाजवळ दुचाकीला अपघात झाला. डंपरने दिलेल्या धडकेत दुचाकी चालकाच्या मागे बसलेल्या महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. तर दुचाकी चालक



हा गंभीर जखमी झाला आहे. घटना स्थळी तातडीने पोलिसांनी पोहचत पंचनामा करीत प्रक्रिया सुरू केल्याची प्राथमिक माहिती मिळाली.

# मातोश्री महाविद्यालयात रस्ते सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शहाड येथील मातोश्री वेलबाई देवजी हरिया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि कल्याण येथील आहेर होंडा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात रस्ते सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दरवर्षी देशात १ जानेवारी ते ३१ जानेवारी हा महिना रस्ते सुरक्षा महिना म्हणून साजरा केला जातो. कल्याण येथील आहेर होंडा येथे कार्यरत असलेले रस्ते सुरक्षा सल्लागार विजय कदम, विजय पोते व सिद्धांत रणसिंग यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून रस्ते सुरक्षासंदर्भात मार्गदर्शन केले. वाहने चालविताना कोणती काळजी



घ्यावी या संदर्भात ग्राउंड वर प्रत्यक्ष विद्यार्थ्यांकडून सुरक्षित वाहन चालविण्याची प्रात्यक्षिके घेण्यात आली. सुरक्षित टू व्हीलर चालवणारे हर्ष पाटील, रोहित ब्राह्मणे व तनुजा पाटील यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्राचार्य डॉ. चिंतामण भोईर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. कविता मांजे व प्रा. सुनंदा शिंदे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

# 7 फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक

## ९ फेब्रुवारीला निकाल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. 29** : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला असल्यामुळे 12 जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या 125 पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला असून 5 फेब्रुवारी 2026 ऐवजी आता 7 फेब्रुवारी 2026 रोजी मतदान; तर 7 फेब्रुवारी 2026 ऐवजी 9 फेब्रुवारी 2026 रोजी मतमोजणी होईल.

राज्य निवडणूक आयोगाने या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी 13 जानेवारी 2026 रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्र मागे घेणे, चिन्ह वाटप आणि निवडणूक लढविणाऱ्या अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे इत्यादी टप्प्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यापुढील मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे शिल्लक आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुकांसाठी 31 जानेवारी 2026 च्या पुढे फक्त दोन आठवड्यांची मुदत वाढ दिली आहे; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे 28 जानेवारी 2026 रोजी अपघाती निधन झाल्यामुळे राज्य शासनाने राज्यात 28 जानेवारी 2026 ते 30 जानेवारी 2026 पर्यंत दुखवटा जाहीर केला आहे. या कालावधीचा विचार करून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या कार्यक्रमातील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना 31 जानेवारी 2026 रोजी प्रसिद्ध करतील. आता 7 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत मतदान होईल. त्यामुळे जाहीर प्रचाराची समाप्ती 5 फेब्रुवारी 2026 रोजी रात्री 10 वाजता होईल. संबंधित ठिकाणी 9 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 10 वाजता मतमोजणी सुरु होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता संपुष्टात येईल. निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात 11 फेब्रुवारी 2026 पर्यंत प्रसिद्ध केली जातील.

# वायू प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना न राबविणा-या 7 बांधकामांवर काम बंदची धडक कारवाई

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तुर्भे विभागांतर्गत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वत:हून दाखल करून घेललेली (Suo Moto) जनहित याचिका क. 3/2023 मध्ये, दिनांक 24 डिसेंबर 2025 रोजी दिलेल्या आदेशानुसार शहरातील वाढत्या वायू प्रदूषणावर तात्काळ व प्रभावी उपाययोजना राबविण्याचे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने, नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये बांधकामाच्या ठिकाणी सुरु असलेल्या कामांमुळे होणा-या ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण व ब्लास्टिंग करीता अवलंबवायची 'मानक कार्यप्रणाली (Standard Operating Procedure - SOP)' व बांधकाम प्रकल्पांच्या साईटवर होणा-या वायू व ध्वनी प्रदूषण दंडात्मक कारवाईबाबतची नियमावली मानक कार्यप्रणाली अन्वये दंडात्मक शुल्क भरणा करणेबाबत संबंधित विकासक / बांधकाम धारकांस कळविण्यात



आलेले होते.

तसेच ध्वनी / वायू प्रदुषण नियंत्रणाकरीता आवश्यक उपाययोजना केल्याबाबत खातरजमा करूनच काम करण्यात यावे. तसेच बांधकाम स्थळच्या सभोवताली 500 मीटर पर्यंतच्या परिसरात व रस्त्यांवर धूळ प्रदूषण होऊ नये याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी अन्यथा सुरु असलेले बांधकाम त्वरित बंद करण्याची कार्यवाही (Stop work) करण्यात येईल अशा आशयाच्या नोटीसा संबंधित विकासक / बांधकाम धारक यांना बजाविण्यात आलेल्या आहेत.

तथापि, महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दि. 24 जानेवारी 2026 रोजी सुरु असलेल्या बांधकाम / विकास कामाच्या ठिकाणी पाहणी केली असता सदर पाहणीमध्ये पुढीलप्रमाणे त्रूटी आढळून आलेल्या होत्या.

1. बांधकाम प्रकल्पाच्या परिघाभोवती किमान 30 फूट उंच टिन धातूचे पत्रे लावणे आवश्यक असताना प्रकल्पावर त्यापेक्षा कमी उंचीचे टिन धातूचे पत्रे आढळून आले.
2. बांधकाम सुरु असलेल्या इमारतींना सर्व बाजूने हिरव्या कापडाच्या ओल्या ज्यूट शीटच्या ताडपत्रीने बंद केलेले आढळून आलेले नाही.
3. बांधकामाच्या ठिकाणी साहित्य लोडींग आणि अनलोडींग करताना वॉटर फॉगींग केले जात नाही.
4. बांधकाम मजुरांनी मास्क, गॉगल्स, ॲप्रॉन इ, परिधान केलेले आढळून आले नाही.
5. बांधकाम स्थळाच्या सभोवतालच्या 500 मीटर पर्यंतच्या परिसरात व रत्यांवर धूळ प्रदुषण होऊ नये याकरिता पाणी फवारणी यंत्र कार्यान्वित असल्याचे आढळून आले नाही.
6. घनमाती / बांधकाम साहित्य इत्यादी वाहतूक करताना हिरव्या कपड्याने झाकलेले आढळून आले नाही.
7. या पाहणी दरम्यान बांधकाम स्थळाच्या ठिकाणी कोणीही जबाबदार प्रतिनिधी / व्यवस्थापक उपस्थित नव्हते.

हवा प्रदूषणात होणा-या वाढी संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई यांची स्वतःहून दाखल करून घेतलेली जनहितार्थ याचिका क्र. 3/2023 च्या आदेशान्वये धूळ व प्रदूषण रोखण्याकरिता विकासक / बांधकाम धारक यांचेमार्फत तातडीने उपाययोजना करणेबाबत आवश्यक आहे. परंतू या बाबत योग्य उपाययोजना केल्या नसल्याचे निदर्शनास आले.

त्यानुसार, दि. 27 जानेवारी 2026 रोजी खालील बांधकामे / विकास कामांच्या साईट्स सीलबंद करण्यात आलेल्या आहेत.

1. मे. साई अमृत बिल्डर्स, भुखंड क्र. 16 व 17, सेक्टर 20, सानपाडा, नवी मुंबई.
2. मे. मेट्रीक्स बिल्डर्स, भुखंड क्र. 10, सेक्टर 19, सानपाडा , नवी मुंबई.
3. मे. प्रोग्रेसिव्ह डेव्हलपर्स, भुखंड क्र. 12, सेक्टर 20, सानपाडा, नवी मुंबई.
4. मे. कामधेनु ग्रीन, भुखंड क्र. 6 व 7, सेक्टर 19, सानपाडा, नवी मुंबई.
5. मे. रॉयल पाम डेव्हलपर्स DPVG Ventures LLP, भुखंड क्र. 9B, सेक्टर 20, सानपाडा, नवी मुंबई.

तसेच दि. 29 जानेवारी 2026 रोजी खालील बांधकामे/विकास कामांच्या साईट्स सीलबंद करण्यात आलेल्या आहेत.

1. मे. कामधेनु लाईफ स्पेस, भुखंड क्र. 18 व 25, सेक्टर- 8, सानपाडा, नवी मुंबई.
2. मे. सत्यम लाईफ स्पेस, भुखंड क्र. 07, सेक्टर 16ए, सानपाडा, नवी मुंबई.

सदर मोहिम महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या आदेशान्वये, अति. आयुक्त डॉ. राहुल गेठे व अतिक्रमण उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड, यांचे मार्गदर्शनाखाली, तुर्भे विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री. सागर मोरे, यांचे नियंत्रणाखाली, तुर्भे विभागातील स्वच्छता अधिकारी श्री. जयेश पाटील, कनिष्ठ अभियंता श्री. विनोद आंब्रे व इतर अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये राबविण्यात आली. या मोहिमेसाठी अतिक्रमण निर्मूलन पथकातील पोलीस अधिकारी, अंमलदार आणि अतिक्रमण विभागातील सुरक्षारक्षक देखील तैनात ठेवण्यात आले होते.

यापुढील काळात नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वायू प्रदूषण रोखण्याकरिता सर्वच विभाग कार्यालय क्षेत्रात कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार आहे.



# रणधिर शिंदे यांना “महाराष्ट्र बिझनेस आयकॉन” पुरस्कार प्रदान



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : रिसेल डॉट.इन या संस्थेच्या वतीने कल्याण येथील रॉयल स्प्लेंडिड हॉलिडेजचे संचालक रणधिर शिंदे यांना पर्यटन क्षेत्रातील उल्लेखनीय व उत्कृष्ट सेवेबद्दल राज्यस्तरीय “महाराष्ट्र बिझनेस आयकॉन” पुरस्कार नाशिक येथे नुकताच प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार हिंदी व मराठी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.शिक्षण क्षेत्रात २७ वर्षे सेवा बजावून मुख्याध्यापक पदावरून स्वेच्छानिवृत्ती घेतल्यानंतर रणधिर शिंदे यांनी कल्याण येथे रॉयल स्प्लेंडिड हॉलिडेज या नामांकित पर्यटन संस्थेची स्थापना केली. या संस्थेमार्फत भारतातील सर्व प्रमुख पर्यटनस्थळांसह परदेशातील युरोप व आशिया खंडात किफायतशीर दरात नियमितपणे यात्रा आयोजित केल्या जातात. ज्येष्ठ नागरिक व महिलांसाठी विशेष सुरक्षित आणि नियोजनबद्ध यात्रा हे या कंपनीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. तसेच एव्हरेस्ट बेस कॅम्प थ्री पासेस या आव्हानात्मक ट्रेकचे सुरक्षित व किफायतशीर आयोजन करणारी महाराष्ट्रातील एकमेव पर्यटन संस्था म्हणून रॉयल स्प्लेंडिड हॉलिडेजची विशेष ओळख आहे. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत रिसेल डॉट.इन या उद्योजक संस्थेने रणधिर शिंदे व त्यांच्या पर्यटन संस्थेचा “महाराष्ट्र बिझनेस आयकॉन” पुरस्काराने गौरव केला.

# ठाणे महापौर उपमहापौर पदासाठी आज नामनिर्देशन अर्ज दाखल



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (30) :** ठाणे महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी शिवसेनेकडून एक तर उपमहापौरपदासाठी भारतीय जनता पक्षाकडून एक असे उमेदवारी अर्ज दाखल झाले असल्याची माहिती महापालिका सचिव मनीष जोशी यांनी दिली. शिवसेनेच्या शर्मिला रोहित पिंपळोलकर यांनी महापौर पदासाठी, तर भारतीय जनता पक्षाचे कृष्णा दादू पाटील यांनी उपमहापौर पदासाठी आज (30 जानेवारी 2026) आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, आमदार निरंजन डावखरे यांच्यासह पक्षाचे गटनेते, नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते.

महापौर व उपमहापौर पदांसाठीची निवडणूक प्रक्रिया मंगळवार दिनांक 3 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 11.30 वा. महापालिकेच्या दुसऱ्या मजल्यावरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात पार पडणार आहे. या निवडणूक प्रक्रियेसाठी पीठासीन अधिकारी ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ उपस्थित राहणार असून त्यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक होणार आहे.

# कायदा शिक्षण व न्यायालयीन अनुभव जोडणारी अकॅडमी उपयुक्त - मुख्यमंत्री फडणवीस



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी मुंबई** :महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या भारतातील पहिल्या ‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ॲडव्होकेट ट्रेनिंग ॲंड रिसर्च सेंटर’ (BBATRC) चे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नवी मुंबईत करण्यात आले. कायद्याचे शिक्षण आणि प्रत्यक्ष न्यायालयीन कामकाज (कोर्ट क्राफ्ट) यातील दरी भरून काढण्यासाठी ही अकॅडमी अत्यंत महत्त्वाची ठरेल, असे त्यांनी सांगितले.

तळोजा येथील या अकॅडमीचे उद्घाटन भारताचे माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण आर. गवई यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर होते. यावेळी मेघालय उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ॲड. अनिल सी. सिंग, महाराष्ट्राचे महाधिवक्ता डॉ. मिलिंद साठे आणि गोव्याचे महाधिवक्ता ॲड. देविदास पांगम उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्य शासनाने कायदेविषयक प्रशिक्षण व संशोधनाला प्राधान्य दिल्याचे सांगून, अकॅडमीसाठी १० कोटी रुपये अनुदान आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर देण्यात येईल, अशी घोषणा केली. बदलते कायदे, नवीन फौजदारी कायदे तसेच AI व तंत्रज्ञानाच्या योग्य वापरासाठी प्रशिक्षित वकील व अभियोजक घडविण्यास हे केंद्र उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विस्तारित अर्थव्यवस्थेनुसार तंत्रज्ञानातील बदलांशी अनुरूप आपली यंत्रणा प्रशिक्षित करणे गरजेचे आहे. पिटिशन ड्राफ्टिंगसाठी एआयचा उपयोग करताना होणाऱ्या धोक्यांबाबतही सतर्क राहायला हवे. संशोधनाशिवाय गुणवत्ता येत नाही, त्यामुळे हे रिसर्च सेंटर भविष्यात दर्जेदार कायदेविषयक संशोधनाचे केंद्र बनेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वरिष्ठ वकील तथा BCMG चे अध्यक्ष हर्षद निंबाळकर यांनी केले. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ‘विधी महर्षी पुरस्कार’ न्यायमूर्ती बी.बी. चव्हाण यांना प्रदान करण्यात आला, तर अमरावतीचे दिवाणी वकील ज्ञानेश्वर बावरेकर यांचा मरणोत्तर पुरस्कार त्यांचे पुत्र ॲड. संजय बावरेकर यांनी स्वीकारला.

या सोहळ्याला बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा (BCMG) चे उपाध्यक्ष ॲड. जयंत डी. जायभावे, BBATRC चे अध्यक्ष ॲड. डॉ. उदय पी. वारुंजीकर, बार कौन्सिल ऑफ इंडियाचे (BCI) सदस्य ॲड. आशिष पी. देशमुख आणि समन्वयक व उपाध्यक्ष ॲड. संग्राम डी. देसाई उपस्थित होते. तसेच बार कौन्सिलचे सदस्य ॲड. मोतीसिंह जी. मोहता, ॲड. गजानन बी. चव्हाण, ॲड. मिलिंद एस. पाटील, ॲड. वंसत डी. साळुंखे, ॲड. मिलिंद एस. थोबडे, ॲड. अविनाश जे. भिडे, ॲड. वसंतराव ई. भोसले, ॲड. अनिल एम. गोवर्दिपे, ॲड. विवेकानंद एन. घाटगे, ॲड. आसिफ एस. कुरेशी, ॲड. अविनाश बी. आव्हाड, ॲड. अमोल एस. सावंत, ॲड. अण्णाराव जी. पाटील, ॲड. सतीश ए. देशमुख, सीनिअर ॲड. सुदीप आर. पासबोला, ॲड. सुभाष जे. घाटगे, ॲड. विठ्ठल बी. कोंडे-देशमुख, ॲड. अहमदखान यू. पठाण, ॲड. राजेंद्र बी. उमाप आणि ॲड. पारिजात एम. पांडे यांचीही विशेष उपस्थिती लाभली.

# एमआयडीसी निवासी मधील गुलमोहरचे अवाढव्य झाड कोसळले



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** डोंबिवली एमआयडीसी, मिलापनगर RL -63 तलाव जवळ एक गुलमोहरचे अवाढव्य झाड महावितरणच्या ट्रान्सफरवर शनिवारी दुपारी एक वाजता कोसळले. त्यामुळे पूर्ण निवासी विभागातील वीज पुरवठा खंडित झाला. या झाडाच्या मोठ्या फांदया या महावितरणच्या उच्च दाबाच्या वाहिनीवर कोसळल्याने त्या वाहिन्या खाली आल्या, तर काही महावितरणचे पोल वाकले गेले आहेत. सुदैवाने तेथील रस्त्यावरून कोणतेही वाहन, नागरिक जात नव्हते. फायरब्रिगेड कर्मचारी येऊन सदर झाड बाजूला करण्याचे काम चालू केले. एमआयडीसी ठेकेदारातर्फे नविन गटारांची कामे चालू असताना खोदाई दरम्यान हे झाड कडेला असल्याने ते झाड पडले असावे अशी शंका नागरिकांनी व्यक्त केली. या घटनेमुळे येथील वाहतूक बंद करण्यात आली होती. डोंबिवली एमआयडीसी निवासी मधील गुलमोहरचे अवाढव्य झाड कोसळले हे निव्वळ एमआयडीसीच्या ठेकेदाराच्या माणसांच्या अक्षम्य चुकीमुळे हे झाड कोसळले. या ठेकेदारांच्या माणसांनी यापूर्वीही अशीच गटारांची खोदकामे चुकीने केल्याने अनेक झाडे, वीज/पाणी वाहिन्या यांना नुकसान पोहचले असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते राजू नलावडे यांनी दिली.

# डोंबिवली महापालिका विभागात गांधीजींच्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली** : राष्ट्रपिता महात्मा गांधी ” यांच्या पुण्यतिथी दिनी आज डोंबिवली पश्चिमेकडील महात्मा गांधी उदयानातील ”राष्ट्रपिता महात्मा गांधी” यांच्या पुतळयास महापालिका उपायुक्त बाळासाहेब चव्हाण यांनी पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. यासमयी उपस्थित ७/ह प्रभागाचे सहा.आयुक्त राजेश सावंत, ६/फ प्रभागाचे सहा.आयुक्त प्रसाद ठाकूर, इतर अधिकारी/कर्मचारी तसेच अनेक नागरिक यांनी देखील राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे पुतळयास पुष्पसुमने अर्पण करून आदरांजली वाहिली.



यावेळी हुतात्मा दिनानिमित्त उपस्थित अधिकारी/कर्मचारी तसेच नागरिकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून आदरांजली वाहिली.

# शामराव पेजे महामंडळाकडून थकबाकीदार लाभार्थींना OTS दिलासा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : ओबीसी महामंडळाच्या थकीत कर्ज प्रकरणात संपूर्ण थकीत कर्ज रक्कमेचा एकरक्कमी भरणा करणाऱ्या लाभार्थीस थकीत व्याज रकमेत 50 टक्के सवलत देण्याबाबतची एकरक्कमी परतावा (OTS) योजना राबविण्यात येत आहे. त्यानुसार महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थींनी सदर योजनेचा लाभ घेऊन कर्जमुक्त व्हावे".महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. मुंबई यांचे जिल्हा कार्यालय-ठाणे यांच्या मार्फत विविध कर्ज योजनेंतर्गत ठाणे जिल्ह्यातील इतर मागास प्रवर्गातील लाभार्थीना स्वयंरोजगाराकरिता अल्प व्याजदराने कर्ज वितरीत करण्यात आलेले आहे. या लाभार्थीना कर्ज परतफेडीसाठी विहित मुदत देण्यात येते. विहित मुदत संपून गेली असताना देखिल बऱ्याच लाभार्थींनी महामंडळाकडे शिल्लक रकमेची परतफेड अद्याप केलेली नाही. तसेच थकीत कर्ज वसुलीसाठी सर्व वैधानिक प्रयत्न महामंडळाकडून करण्यात येत आहेत.

याकरीता महामंडळाच्या थकीत लाभार्थीसाठी संपूर्ण थकीत कर्ज रक्कमेचा एकरकमी भरणा करणाऱ्या लाभार्थीस थकीत व्याज रकमेत 50 टक्के सवलत देण्याची सुधारीत एकरकमी परतावा OTS योजना नव्याने राबविण्यात येत आहे. या योजनेचा (एक रकमी परतावा-OTS) लाभ घेऊन सर्व संबंधित लाभार्थीनी थकीत मुद्दल व व्याज रक्कम एकरकमी भरणा करुन कर्ज खाते बंद करून कर्ज मुक्त व्हावे व भविष्यात होणारी संभावित कायदेशिर कार्यवाही टाळावी, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, ठाणे यांनी केले आहे.कार्यालयाचा पत्ताः शामराव पेजे, कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ लि. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, दुसरा मजला, दत्तवाडी, खारेगाव रोड, कळवा (पश्चिम), ठाणे-400605, फोनः 022-20813625 व Email-dmobcthane@gmail.com.

# डोंबिवलीत भव्य राज्यस्तरीय गुलाब प्रदर्शन भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली** : डोंबिवलीकरांना वर्षभर प्रतीक्षा असलेले डोंबिवली रोझ फेस्टिवल हे भव्य गुलाब पुष्प प्रदर्शन शनिवार ३१ जानेवारी आणि रविवारी १ फेब्रुवारी आयोजित करण्यात आले आहे. भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून सुरु झालेला डोंबिवलीकर रोझ फेस्टिवल रामनगर येथील बालभवन येथे संपन्न होत आहे. मुंबई महानगर प्रदेशातील सर्वात मोठे गुलाब पुष्प प्रदर्शन असून यंदाचे १६ वे वर्ष आहे.

नागपूरच्या प्रशांत तेलंग यांनी यंदाचा डोंबिवलीकर रोझ फेस्टिवल गाजवला. त्यांच्या फुलांना गुलाबांचा राजा, गुलाबांची राणी, सर्वोत्तम सुवासिक गुलाब आणि सर्वोत्तम भारतीय प्रजाती गुलाब यांसह एकूण १६ बक्षिसे मिळाली. टिळक उद्यान, मंछेर इराणी, मन्सूरा हसन, चंद्रकांत मोरे, आशिष मोरे, सुरेश पोकळ यांच्या गुलाबांना विविध गटांत पारितोषिके मिळाली.



कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे नवनिर्वाचित उपमहापौर राहुल दामले, कडोंमपा भाजपा गटनेते शशिकांत कांबळे, जेष्ठ माजी नगरसेवक संतोष केणे, भाजपाचे डोंबिवलीतील सर्व नवनिर्वाचित नगरसेवक यांसह भाजपा डोंबिवली पूर्व व पश्चिम मंडळ अध्यक्ष आणि पदाधिकारी या प्रसंगी उपस्थित होते. इंडियन रोझ फेडरेशनच्या अध्यक्षपदी अर्शद भिवंडीवाला आणि खजिनदारपदी जगदीश म्हात्रे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

डोंबिवलीकर गुलाबप्रेमी नागरिक बंधू भगिनी विशेषतः सर्व वयोगटातील महिला वर्ग आपल्या कुटुंबासह गुलाबांच्या अनोख्या दुनियेत अतिशय रमलेले दिसले. इंडियन रोझ फेडरेशन ह्या अखिल भारतीय गुलाबप्रेमी संस्थेच्या वतीने महाराष्ट्रातील मोठमोठ्या गुलाब शेती करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना डोंबिवली रोझ फेस्टिवलमध्ये निमंत्रित करण्यात येते. मुंबई, पुणे, वांगणी, पनवेल, शहापूर, नाशिक आणि नागपूर येथून प्रदर्शक सहभागी झाले आहेत.

डोंबिवली रोझ फेस्टिवल म्हणजे डोंबिवलीकरांच्या कॅलेंडर मधला ”अनिवार्य उपस्थितीचा” असा विषय असतो. हजारो डोंबिवलीकर रांग लावून शिस्तीत गुलाबांची मोहक दुनिया अनुभवायला आणि गुलाब रोपे विकत घेण्यासाठी येतात. गेली १४ वर्षे डोंबिवलीकर रोझ फेस्टिवल आणि सेलिब्रिटी उपस्थिती हे समीकरण जुळले आहे, हे विशेष. दर्दी गुलाबपुष्प रसिकांना हे प्रदर्शन म्हणजे पर्वणी असते त्याचबरोबर हल्ली सोशल मीडियावर पोस्ट, स्टोरी आणि रिल्ससाठी युवापिढी गर्दी करताना दिसते. प्रदर्शन विनामूल्य असून शनिवारी ३१ जानेवारी आणि रविवारी १ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते १० दरम्यान बाल भवन रामनगर डोंबिवली पूर्व येथे खुले राहील.

# महापालिकेच्या ७/ह प्रभागात अनाधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या आदेशानुसार ,उपायुक्त समीर भुमकर व बाळासाहेब चव्हाण यांच्या निर्देशानुसार ७/ह प्रभागाचे सहा. आयुक्त राजेश सावंत यांनी डोंबिवली पश्चिम येथील देवीचा पाडा (स्मशानभूमीच्या मागे) तसेच नवीन देवीचापाडा येथील २५ खोल्या आणि १० चाळीचे जोते संपूर्णतः निष्कासित करण्याची कारवाई केली.

सदर कारवाई फेरीवाला पथकाचे कर्मचारी, ठेकेदाराचे १० कामगार , १ जे.सी.बी. यांच्या सहाय्याने करण्यात आली.

# रास्तभाव धान्य दुकाने विधवा व दिव्यांगांना देण्याची मागणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : मुरबाड तालुका खरेदी विक्री संघाच्या अखत्यारीत मुरबाड शहर व तालुक्यात एकुण 16 रास्तभाव धान्य दुकाने आहेत. मात्र ही दुकाने गेली अनेक वर्ष नाममात्र भाडेपोटी श्रीमंत,धनदांडग्या व्यक्तींना चालविण्यासाठी दिली असून या दुकानदारांनी मोठ्या प्रमाणात गरिबांच्या धान्याचा अपहार केल्याचे समोर आले आहे, तरीसुद्धा खरेदी विक्री संघाने अनेकवेळा या दुकानदारांना पाठीशी घातले आहे. शासनाच्या धान्याचा अपहार करणारे व खरेदी विक्री संघांचे आर्थिक नुकसान करणाऱ्या दुकानदारांकडून ही दुकाने काढून ती नव्या पद्धतीने शहर व तालुक्यातील गरजू विधवा महिला,दिव्यांग व्यक्ती, बेरोजगार तरूण-तरूणींना, बचत गटांना चालविण्यासाठी देण्यात यावे अशी लेखी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार दिलीप पवार यांनी खरेदी विक्री संघाचे प्रशासकीय चेअरमन यांच्याकडे केली आहे.

# ऐतिहासिक नाणी व स्टॅम्प पेपरसह आंतरशालेय विज्ञान प्रदर्शन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली :** विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी 2014 पासून डावखर इन्फ्रा, रिजन्सी ग्रुप, समर्थ पेट्रोलियम, एनए सोल्युशन, डावखर फाउंडेशन, डावखर फिल्म यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान आणि इतिहास विषयावर आधारित प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते.विद्यार्थ्यां मधील कला गुणांना संधी देण्यासाठी त्यांच्यातल्या शास्त्रज्ञांना वाव देण्यासाठी कल्याण डोंबिवली परिसरातील विद्यार्थ्यांसाठी आंतर शालेय विज्ञान प्रदर्शन 29 व 30 जानेवारी 2026 रोजी बेलग्रेव स्टेडियम, रीजन्सी अनंतम, डोंबिवली (पूर्व) येथे सकाळी 10 ते संध्याकाळी 8 या वेळेत पार पडले. सदरचे प्रदर्शन हे सर्वांसाठी विनामूल्य होते. तसेच शाळांसाठी बसची सेवा देखील उपलब्ध करून देण्यात आली होती. यावर्षी हिस्टोरिकल कॉइन्स आणि हिस्टोरिकल स्टॅम्प पेपर चे प्रदर्शन देखील आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना विज्ञान विषयामध्ये स्वारस्य घेण्यास प्रवृत्त करण्यासाठी विशेष आंतरशालेय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. तसेच पोस्टर स्पर्धेचे देखील आयोजन करण्यात आले होते. जिंकणाऱ्या शिक्षकांना व विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक, पदक, प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देण्यात आले असून या वर्षी 45 शाळा सहभागी झाल्या होत्या तर 80 प्रोजेक्ट मांडण्यात आले होते. प्रदर्शनाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदक, अभिनेता प्रणव भांबुरे यांनी केले. 5 ते 7 आणि 8 ते 10 अशा 2 गटामध्ये स्पर्धा झाली आणि 1.50 लाखाची बक्षीस विजेत्यांना मिळवली.



विज्ञान प्रदर्शनासाठी एआय आधारित स्मार्ट सुरक्षा, सोलार ट्रेकिंग सिस्टम, स्मार्ट कचरा वर्गीकरण, हायड्रोजन फ्युएल सेल, स्वयंचलित रोप पाणीपुरवठा, प्लास्टिक ते इंधन संकल्पना, पायजोइलेक्ट्रिक फूड स्टेप पावर जनरेटर आणि पोस्टर्स स्पर्धेसाठी हवामान बदल, एआय व रोबोटिक्स, चंद्रयान 3 मोहीम, पाणी वाचवा जीवन जगवा, प्लास्टिक प्रदूषण जनजागृती, मानवी मेंदू, हेल्दी फूड विरुद्ध जंक फूड, विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा, सौरमंडळ असे विविध विषय देण्यात आले होते. विज्ञान प्रदर्शनात 5 ते 7 वी गटात ओमकार इंग्लिश स्कूल आणि डॉन बॉस्को स्कूल प्रथम क्रमांक विभागून तर ओमकार केंब्रिज स्कूल यांना द्वितीय आणि गणेश विद्यालय यांना तृतीय तसेच 8 ते 10 वी गटात प्रथम क्रमांक रतनबुवा पाटील विद्यालय यांना देण्यात आला. तर द्वितीय शंकरा विद्यालय आणि श्री चैतन्य टेक्नो स्कूल विभागून आणि तृतीय सेंट जॉन स्कूल यांना देण्यात आला. पोस्टर स्पर्धेमध्ये अनुक्रमे 5 ते 7 वी गटात गणेश विद्या मंदिर, शंकरा विद्यालय, न्यू श्री वाणी विद्यालय यांनी प्रथम द्वितीय तृतीय आणि 8 ते 10 वी गटात ओमकार इंटरनॅशनल स्कूल, बी टी गायकवाड इंग्लिश स्कूल, सेंट जॉन स्कूल यांनी प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक मिळवला आहे. तर बेस्ट प्रेझेंटर म्हणून गणेश विद्यालयचा अनुज काटले आणि नूतन ज्ञान मंदिरची काव्या तुपे यांना पुरस्कार मिळाला.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024